# मुंबई विद्यापीठ

**मानव संसाधन विकास कक्ष**
कक्ष क्र. २१३, एम्.जी.रोड, फोर्ट,
मुंबई - ४०० ०३२

वेब साईट : www.mu.ac.in
ई-मेल : dr.estab@fort.mu.ac.in

**( नॅक पुनर्मूल्यांकनाव्दारे ३.६५ (सी.जी.पी.ए.) सह अ++ श्रेणी**
**विद्यापीठ अनुदान आयोगाव्दारे श्रेणी १ विद्यापीठ दर्जा )**

दूरध्वनी : ०२२-६८३२००९३/९४


---

क्र.मासंविक/आयसीसी/२०२४-२५/०३ दि. २४ जून, २०२४

## परिपत्रक

**विषय : विद्यापीठ कर्मचाऱ्यांकरीता 'लोकसत्ता अर्थसल्ला' हे गुंतवणूक मार्गदर्शन सत्र आयोजित करण्याबाबत.**

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, समन्वयक/संचालक, ठाणे उपकेंद्र, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, स्था. नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व स्थायी/अस्थायी शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांना कळविण्यात येते की, बदलत्या आर्थिक पर्यावरणात चांगल्या गुंतवणुकीतून जास्तीत जास्त लाभ कसा मिळवावा, यासाठी एक महत्वाचा उपक्रम **'लोकसत्ता अर्थसल्ला'** हा साधारण दिड तासांचा उपक्रम दैनिक लोकसत्ता व मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठ कर्मचाऱ्यांकरीता आयोजित करण्यात आला आहे.

सदरहू गुंतवणूक मार्गदर्शन सत्र विनामुल्य असून नामवंत अर्थतज्ज्ञ गुंतवणुकीबाबत मार्गदर्शन करणार आहेत. त्यानुसार दिनांक २९ जून, २०२४ रोजी फोर्ट येथे कार्यरत कर्मचाऱ्यांना दुपारी ३.०० वाजता व विद्यानगरी येथे कार्यरत कर्मचाऱ्यांना दुपारी २.०० वाजता एखादी त्वरीत बाब असल्यास ती बाकी राहू नये याची काळजी घेऊन सदर मार्गदर्शन सत्रास उपस्थित राहण्याची विद्यापीठ प्रशासनातर्फे अनुमती देण्यात आलेली आहे. विद्यापीठातील अधिकाधिक शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांनी सदर उपक्रमाचा लाभ घ्यावा ही विनंती.

**मार्गदर्शन सत्र ठिकाण व वेळ :-**

-: ठिकाण :-

**सर कावसजी जहांगीर पदवीदान सभागृह,**
**मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ३२**

**दिनांक : २९ जून, २०२४ (शनिवार)**
**वेळ :- दुपारी ३.१५ ते ५.०० वा.**

Baliram

**( प्रा. बळीराम गायकवाड )**
**प्रभारी कुलसचिव**

..२

**(अ) प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :**

१) विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक / विभाग प्रमुख, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्रांचे समन्वयक/संचालक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, स्था. नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसंचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख

२) स्वीय सहायक : १) कुलगुरु २) प्र-कुलगुरु ३) कुलसचिव ४) संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ

**(ब) प्रत माहितीसाठी अग्रेषित :-**

१) सचिव, उमासा.
२) सचिव, मुंबई विद्यापीठ ऑफिसर्स वेल्फेअर असोशिएशन
३) सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ
४) सरचिटणीस, एज्युकेशनल एम्प्लॉईज वेल्फेअर असोशिएशन
५) सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ मागासवर्गीय कर्मचारी संघटना
६) सचिव, ऑल इंडिया आदिवासी एम्पलॉइज फेडरेशन शाखा मुंबई विद्यापीठ.